


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २३९, शनिवार ८ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मविआचे १२ आमदार मुंबईला घेऊन जाणार!

## विरोधकांचे बारा वाजविणार ! नीलेश लंके यांची घोषणा

हंगा : विशेष प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीमध्ये मतदारांनी नगर जिल्हयात दोन्ही मतदारसंघात महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिला आहे. आता आगामी विधानसभा निवडणूकीत आपण लक्ष घालणार असून महाविकास आघाडीचे सर्व १२ आमदार मुंबईला घेउन जात विरोधकांचे बारा वाजविणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.**

खासदार नीलेश लंके यांनी त्यांच्या हंगे येथील निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. नगर जिल्हयात महाविकास आघाडीला यश मिळाले आहे. कोणतीही निवडणूक असो नीलेश लंके हे नाव एक ब्रँड म्हणून पुढे येते. आगामी विधानसभा निवडणूकीत दक्षिणेसह उत्तरेतही लक्ष घालणार का ? या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, शंभर टक्के जिल्हयातून महाविकास आघाडीचे सर्व १२ आमदार मी मुंबईला घेऊन जाणार आणि विरोधकांचे बारा वाजविणार असा विश्वास व्यक्त केला.

खा. लंके यांचे खंदे समर्थक ॲड. राहुल झावरे यांच्या मारहाणप्रकरणी बोलताना लंके म्हणाले, झावरे यांच्या मनक्याला मार असून चेहऱ्यास फ्रॅक्चर झालेले आहे. डोक्यासही मार आहे. हल्लेखोरांपैकी चौघे पोलीसांच्या ताब्यात आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. पोलिस प्रशासनाने ही घटना घडल्यानंतर तातडीने कारवाई केली. जशी घटना घडली त्याप्रमाणचे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर खालच्या पातळीवरील राजकारण सुरू आहे का अशी विचारणा करण्यात आली असता राजकारण असो किंवा नसो, या घटनेच्या खोलात मला जायचे नाही. चार तारखेपर्यंत मी एका पक्षाचा उमेदवार म्हणून जनतेसमोर गेलो. निकालानंतर मी आता संपूर्ण नगर दक्षिण मतदारसंघाचा कुटूंबप्रमुख आहे. कुटूंबप्रमुखाने जबाबदारीने वागले पाहिजे त्यामुळे प्रत्येक गोष्टीमध्ये राजकीय भाष्य करणे उचित ठरणारे नाही. घडलेली घटना चुकीची आहे. अशा घटना यापुढील काळात होणार नाहीत याची पोलीस प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे.

परवा जामखेड तालुक्यातील एका मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यास मारहाण झाली. जीवघेणा हल्ला होऊनही गुन्हा दाखल करण्यात येत नव्हता. त्यासाठी मला संपर्क करावा लागला व त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही लंके यांनी सांगितले.

पोलीस प्रशासनावर राजकीय दबाव आहे असे वाटते का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, पोलीसांना समाज तसेच सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांना सांभाळावे लागते. तरीही त्यांच्यावर दबाव आणला जातो. परंतू ते २४ तास समाजाच्या सुरक्षितेसाठी काम करत असतात. त्यांच्यावर आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा यापुढील कालखंडात सुधारणा कशी करता येईल यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. माझ्या लोकसभा मतदारसंघातील गुंडगिरी, दशहत थांबली पाहिजे हेच आपले मिशन आहे.



### नगर येथे नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार

१० जुन रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा नगर येथे होतो आहे. पक्षाचे वरीष्ठ नेते नगरमध्ये येत आहेत. पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत हा मेळावा पार पडणार असून पक्षाच्या नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार या मेळाव्यात करण्यात येणार आहे असल्याचे लंके म्हणाले.

### जनतेची उर्जा मला विजयापर्यंत घेऊन जाते

शरद पवार यांनी लोकसभा निवडणूक लढविण्याची सुचना दिल्यानंतर मी आमदारकीचा राजीनामा देउन निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जनतेने ही निवडणूक हाती घेतली. माझी सर्वसामान्यांशी नाळ जोडलेली आहे. जनता हीच माझी उर्जा आहे, हीच उर्जा मला विजयापर्यंत घेऊन जाते असे लंके यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### कार्यकर्त्यांना शांततेचे आवाहन


राहुल झावरे यांना मारहाण झाल्यानंतर सुमारे एक हजार कार्यकर्ते पारनेरमध्ये जमा झाले होते. अतिशय तणावाचे वातावरण होते. आजही पोलीसांचा मोठा बंदोबस्त आहे. या पार्श्वभुमीवर कार्यकर्त्यांना काय आवाहन कराल या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी कार्यकर्त्यांना शांततेचे आवाहन केले आहे. काल घटना घडली त्यावेळी मी श्रीगोंदे तालुक्यात होतो. नगरमध्ये आल्यानंतर ही घटना समजली. त्यानंतर मी कार्यकर्त्यांशी संपर्क करून शांतता राखण्याचे आवाहन केले. हल्लेखोरांना अटक करण्याचे, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे काम पोलीसांचे आहे, ते पोलीस करतील.

### जिल्हयात परिवर्तन झाले

राष्ट्रवादीची ताकद लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने वाढताना दिसत आहे, अनेकांचे भावी आमदार म्हणून बॅनर झळकू लागले आहेत. या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, प्रत्येक कार्यकर्ता उत्साही असतो. त्यांचा उत्साह आपण थांबवू शकत नाही. निवडणूकीच्या शेवटच्या टप्प्यात काय परिस्थिती निर्माण होते, त्यावरच निर्णय घ्यावे लागतात. नगर जिल्हयाने महाविकास आघाडीचे नेतृत्व मान्य केले आहे. नगर दक्षिण मध्ये मला तर शिर्डी मतदार संघात भाउसाहेब वाकचौरे यांना महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून मतदारांनी संधी दिली असल्याने जिल्हयात परिवर्तन झालेले आहे.

# औटी व साथीदारांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा

## ■ आर्म ॲक्टसह विविध कलमांचाही समावेश ■ राहुल झावरे यांची प्रकृती स्थिर ■ चौघांना ५ दिवसांची कोठडी





पारनेर : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांचे निकटवर्तीय, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे सचिव ॲड. राहुल झावरे यांच्यावर गुरूवारी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी ॲड. झावरे यांनी रूग्णालयात दिलेल्या जबाबावरून मा. नगराध्यक्ष विजय औटी, मा. नगरसेवक नंदकुमार औटी यांच्यासह १२ जणांविरोधात खुनाचा प्रयत्न, आर्म ॲक्टसह विविध कलमांन्वये पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या हल्ल्याप्रकरणी पोलीसांनी अटक केलेल्या चौघांना शुक्रवारी पारनेर न्यायालयापुढे उभे केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली.**

ॲड. राहुल झावरे यांनी दिलेल्या जबाबाप्रमाणे ॲड. झावरे यांच्या वनकुटे या गावातील नागरीकांनी आरोपी विजय सदाशिव औटी यास गावातून हकलून देऊन अपमान केल्याच्या कारणावरून त्यांच्यावर हा हल्ला करण्यात आला. ॲड. राहुल झावरे हे त्यांचे सहकारी राजेंद्र तराळ यांच्याबरोबर स्विफ्ट कारमधून पारनेरमध्ये येत असताना विजय औटी, नंदकुमार औटी यांच्यासह १२ आरोपी तसेच अनोळखी तीन ते चार जणांनी झावरे यांची कार आडवून राजेंद्र तराळ व ॲड. राहुल झावरे यांना कारच्या खाली उतरविले. लोखंडी कोयत्याने कारची काच फोडून झावरे यांना जमावाने रस्त्यावर पाडले. त्यांचा गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला.

झावरे यांच्या डोक्यात वीट मारून, अंगावर गजाने मारहाण करण्यात आली. झावरे यांच्या पाठीवर, पोटावर, छातीवर चेहऱ्यावरही मारहाण करण्यात आली. झावरे यांच्या मानेवर कोयत्याने मारण्याचाही प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी तो वार चुकविल्याने त्यांच्या डाव्या खांद्यास जखम झाली.

आरडा ओरडा सुरू असल्याने झावरे यांच्या ओळखीचे लोक धाऊन येत त्यांची या मारहाणीतून सुटका करण्यात आली होती. झावरे यांना पारनेरच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर नगरच्या सिव्हील हॉस्पिटल व त्यानंतर नगरमध्ये खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात येऊन तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### या कलमांन्वये दाखल झाले गुन्हे

खुनाचा प्रयत्न, घातक हत्यारांनी दुखापत पोहचविणे, इच्छापूर्वक दुखापत पोहचविणे, गैरपणे निरूध्द करणे, आर्थिक नुकसान करणे, बेकायदेशीर जमावाचा घटक असणे, दंगा करणे, हत्यारांसह दंगा करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उददेशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदडपशा दाखविणे.

### हे आहेत आरोपी

विजय सदाशिव औटी, नंदू सदाशिव औटी, प्रितेश पानमंद, अंकुश भागाजी ठुबे, नीलेश उर्फ धनु दिनकर घुमटकर, संगम सोनवणे, नामदेव लक्ष्मण औटी, मंगेश सुभाष कावरे, पवन बाबा औटी, प्रमोद जगन्नाथ रोहोकले, प्रथमेश दत्तात्रेय रोहोकले, सुरेश अशोक औटी व इतर अनोळखी ३ ते ४ इसम.

### विजय औटीने रिव्हॉल्व्हर रोखला

मारहाणीनंतर आरोपी विजय औटी याने त्याच्याजवळील रिव्हॉल्व्हर झावरे यांच्या कानाला लावत तु जरी वकील असला तरी तुला सोडणार नाही. आम्हाला कायदा समजत नाही. आतापर्यंत दोन–तीन खून केले आहेत. मला काही फरक पडत नाही असा दम दिला. त्यानंतर कारच्या बोनेटवर बसून तुला गाडीखाली चिरडून मारणार अशी धमकीही औटी याने दिल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

### झावरे यांना पुण्याला हलविणार ?

ॲड. राहुल झावरे यांची प्रकृती स्थिर असली तर त्यांच्या घसा तसेच चेहऱ्याचे हाड फॅक्चर असून त्यावरील शस्त्रक्रियेसाठी त्यांना पुण्याला हलविले जाऊ शकते. वरीष्ठ डॉक्टरांशी चर्चा केल्यानंतर त्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### पाच दिवसांची पोलीस कोठडी

ॲड. झावरे यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी विजय सदाशिव औटी, नंदू सदाशिव औटी, प्रितेश पानमंद व मंगेश सुभाष कावरे यांना गुरूवारीच पोलीसांनी अटक केली होती. त्यांना शुक्रवारी मोठया पोलीस बंदोबस्तात पारनेरच्या न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी दिल्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणूकीसाठी महायुतीमध्ये रस्सीखेच

## ■ भाजपाकडून उमेदवारीवर दावा ■ राष्ट्रवादी आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधात उघड भूमिका

नगर : प्रतिनिधी

**एकीकडे नगर जिल्हयातील लोकसभेच्या दोन्हीही जागा महाविकास आघाडीने महायुतीकडून हिरावून घेतलेल्या असताना नगर शहरात भाजपाला आघाडी म्हणून भाजपामधील काही नेत्यांनी राष्ट्रवादी आमदार संग्राम जगताप यांच्या विरोधी उघड भूमिका घेत या उमेदवारीवर भाजपाचा दावा केला आहे.**

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी तर नगर शहर विधानसभा मतदारसंघातून भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्याची मागणी करीत संग्राम जगताप यांच्या उमेदवारीस उघडपणे विरोध दर्शविला आहे.

लोकसभा निवडणूकीत भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांना मताधिक्य मिळाले आहे. पक्षासाठी शहरात पोषक वातावरण असल्याचा दावा करीत भाजपाने शहरात ओबीसी उमेदवारास उमेदवारी देण्याची रणनीती आखल्याची चर्चाही झडत आहे. भाजपाच्या वतीने पंकजा मुंडे यांनी उमेदवारी करावी अशी मागणी करण्यात येत अतानाच दुसरीकडे अभय आगरकर, बाबासाहेब वाकळे, भैयया गंधे हे देखील विधानसभा उमेदवारीसाठी उत्सुक आहेत.

भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य वसंत लोढा यांनीही आ. संग्राम जगताप यांच्या उमेदवारीस त्यांचे नाव न घेता आक्षेप घेतला आहे. विखे यांना नगर शहरात केवळ ३१ हजारांचेच मताधिक्य का मिळाले असा प्रश्न त्यांनी उपस्थित करीत याचे श्रेय केवळ भाजपा आणि आपणास आहे. त्याचे श्रेय इतरांनी घेऊ नये असेही लोढा यांनी सुचित केले आहे.

सन १९९१ मध्ये भाजपाच्या वतीने राजाभाऊ झरकर यांनी निवडणूक लढविली. विखे–गडाख ही बलाढय लढत होत असतानाही शहरात झरकर यांना शहरातून २४ हजार मते मिळाली होती. खा. दिलीप गांधी यांनाही शहरातून मोठे मताधिक्य मिळत होते सन २०१९ मध्ये विखे यांना ५४ हजारांचे मताधिक्य होते. यावेळी मताधिक्य वाढेल अशी अपेक्षा असताना नगर शहराच्या लोकप्रतिनिधींची नाराजी, त्यांची व त्यांच्या टोळीची असलेली दहशत, अवैध व्यवसाय, शहरात जागांची होणारी ताबेमारी, शहरातील खुनांचे सत्र, एस पी ऑफीस प्रकरण, विरोधकांवर खोटे गुन्हे दाखल करणे, असे प्रकार शहरात सुरू असून त्यांना राजाश्रय मिळाल्याचे चित्र असल्याचे लोढा यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद करण्यात आले आहेत. अशा गोष्टींमुळे मतदार भाजपापासून दूर गेले.

विखे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना कर्डीले, जगताप, कोतकरांची छायाचित्रे घेऊन शक्तीप्रदर्शन करण्यात आले. त्याचा परिणाम मताधिक्क्यात झाला. याच कमी मताधिक्क्यामुळे विखेंचा पराभव झाल्याचे लोढा यांचे म्हणणे आहे. लोकसभा निवडणूकीच्या माध्यमातून पक्षाला अनेक गोष्टींचा उलगडा झाला आहे. सोयरे–धायरे पध्दतीमुळे भाजपाचे नगर शहरात गेल्या दहा वर्षात भाजपाचे मोठे नुकसान झाले असल्याचेही लोढा यांनी या निवेदनात नमुद केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

शिवसेना

शिवसेना

### शिवसेनेमुळे भाजपाचे १३ टक्के मतदान घटले !

शिवसेनेच्या नगर शहरातील मतांमुळे नुकत्याच पार पडलेल्या निवडणूकीत भाजपाची १३ टक्के मते घटून मताधिक्क्य २७ हजारांनी कमी झाले. हीच मते या निवडणूकीत निर्णायक ठरली. शिवसेना उध्दव ठाकरे सोबत असताना सुजय विखे यांना २०१९ मध्ये १ लाख ८ हजार ८६० मते मिळाली होती. एकूण मतदानाच्या ६६.११ टक्के ही मते होती. सन २०२४ मध्ये विखे यांना १ लाख ५ हजार ८४९,५८.७७ टक्के तर प्रतिस्पर्धी उमेदवार नीलेश लंके यांना ७४ हजार २६३ मते, ४१.२३ टक्के मिळाली. यावरून भाजपाच्या मतांमध्ये घट तर महाविकास आघाडीच्या मतांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

योगीराज गाडे, मा. नगरसेवक

### महाविकास आघाडीतही चढाओढ

लोकसभा निवडणूकीनंतर खा. नीलेश लंके यांच्या शुभेच्छांचे फलक शहरामध्ये लावण्यात आले. काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनीही किरण काळे युथ फाउंडेशनच्या वतीने बॅनर लावत काळे यांचा भावी आमदार असा त्यावर उल्लेख करण्यात आला. इतिहास घडणार, शहर बदलणार असे स्लोगनही या फलकार आहे. सध्या नगर शहराची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे असल्याने अभिषेक कळमकर हे देखील उमेदवारीसाठी उत्सुक आहेत. शिवसेनेच्या वतीनेही उमेदवारीसाठी तयारी करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्येही उमेदवारीसाठी चढाओढ असल्याचे चित्र आहे.







# प्रगतीमंत्र



# दहावी-बारावी परीक्षेचा बदलणार पॅटर्न



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावी परीक्षेच्या पध्दतीमध्ये बदल करण्यात येणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी दहा विषयांची परीक्षा द्यावी लागणार आहे. तर बारावीच्या विद्यार्थ्यांना दोन भाषा विषयांसह किमान दोन गटांमधील सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्या प्राधिकरणाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या तिसरी ते बारावीच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दहावी-बारावी परीक्षेच्या बदलांबाबत नमूद करण्यात आले आहे.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अर्थात विद्या प्राधिकरणाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला तिसरी ते बारावीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा जनतेसाठी खुला करण्यात आला असून त्यावर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. यामध्ये संबंधित इयत्तांमधील अभ्यासक्रमांचा संपूर्ण आराखडा मांडण्यात आला आहे. या आराखड्यात दिलेल्या माहितीनुसार, दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये आमुलाग्र बदल करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. माध्यमिक शिक्षणाचे दोन टप्पे करण्यात आले आहेत. यामध्ये नववी व दहावी आणि इयत्ता अकरावी व बारावी अशा दोन भागात वर्गीकरण करण्यात आले आहे. नववी व दहावीमध्ये 3 भाषा, गणित व संगणकीय विचार, सामाजिकशास्त्र, विज्ञान, कला शिक्षण, शारीरिक शिक्षण व निरामयता, व्यावसायिक शिक्षण व आंतरविदयाशाखीय क्षेत्रातील एक विषय असे एकूण 10 विषय असतील. अकरावी व बारावीमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या गटाच्या निवडीनुसार सखोल अभ्यास राहणार आहे. नववी व दहावीसाठी शाळांनी 10 विषय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अकरावी व बारावीसाठी कमीत कमी 2 भाषा, गट 2. 3 व 4 मधून कमीत कमी 2 गटातील विषय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. 5 वर्षात शाळांनी सर्व चारही गटातील विषय व 10 वर्षांत विद्यार्थ्यांना जास्तीचे विषय निवडण्यांचे स्वातंत्र्य व लवचिकता प्रदान करण्यासाठी तयार राहावे, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य मंडळाने दहावीसाठी सर्व विषय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तर इयत्ता बारावीसाठी विषय निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

## दहावीसाठी हे दहा विषय...

मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, गणित भाग एक आणि दोन, विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग एक आणि दोन, इतिहास व राज्यशास्त्र, भूगोल, आरोग्य आणि शारिरीक शिक्षण, जलसुरक्षा या नऊ प्रमुख विषयांसह एनसीसी, एमसीसी, संरक्षणशास्त्र, कलारसास्वाद व स्वविकास, रस्ता सुरक्षा, स्काऊट आणि गाईड यांमधील एका विषयांत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे.

## बारावीसाठी हे विषय...



- बारावीसाठी दोन भाषा विषय, पर्यावरण शिक्षण, चार वैकल्पिक विषय, तीन किमान कौशल्यांवरील व्यावसायिक विषय असे किमान दहा विषय उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. यामध्ये 1 ) अनिवार्य विषय - इंग्रजी 2 ) द्वितीय भाषा : आधुनिक भारतीय आणि आधुनिक परकीय भाषा, अभिजात भारतीय भाषा यामधून एक, माहिती तंत्रज्ञान हा 200 गुणांचा विषय बायफोकलमध्ये निवडल्यास या विषयात सूट आहे.
- 3 ) पर्यावरण शिक्षण : कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखानिहाय पर्यावरण विषयात 50 गुणांऐवजी प्राप्त गुणांचे श्रेणीमध्ये रूपांतर केले आहे. जलसुरक्षा हा नवीन श्रेणी विषय अनिवार्य राहील 4 ) वैकल्पिक विषय : एकूण 4 विषयांची निवड ( एकूण कला, शास्त्र, विज्ञान या शाखांमध्ये 45 विषयांचे विकल्प ) 5 ) किमान कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम : दोन भाषा, जनरल फाऊंडेशन
- किमान कौशल्यांवरील व्यावसायिक विषय ( 3 ) विषयांची निवड एकूण 30 विषयांतून ) - जपानी भाषेचा नव्याने समावेश, सामान्यज्ञान हा 100 गुणांचा विषय सैनिकी शाळांमधील विदयार्थ्यांना अनिवार्य, गणित, शास्त्र आणि भूगोल विषयातून प्रात्यक्षिक अनिवार्य, पर्यावरण विषयात प्रकल्प अनिवार्य, तर इतर विषयांमधून वैकल्पिक आणि सरावासाठी एकूण 146 विषय उपलब्ध राहणार आहेत.



“राज्य अभ्यासक्रम आराखड्यावर आता अभिप्राय मागविण्यात आले आहेत. त्यानंतर मसुदा अंतिम होईल. त्यानंतर दहावी-बारावी परीक्षासंदर्भात शासन धोरण निश्चित करेल. शासनाच्या धोरणानुसार दहावी-बारावीच्या परीक्षा पध्दतीमध्ये बदल करण्यात येणार असून शासनाच्या निर्देशानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

– **शरद गोसावी,** अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

# प्रवेश क्षमतेची माहिती अचूक भरा!

## तंत्रशिक्षण संस्थांना माहिती भरण्यासाठी २१ जूनपर्यंत मुदत

तंत्रशिक्षण संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष 2024- 25 साठी प्रवेश प्रक्रिया राबवताना अचूक प्रवेश क्षमतेची माहिती भरण्याबरोबरच संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करून 21 जून 2024 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ऑनलाइन पद्धतीने सादर करावी, असे निर्देश तंत्रशिक्षण संचालनालयाने पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या प्राचार्यांना दिले आहेत.

याबाबत संस्थांना https://dte maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाइन प्रणाली दि. 22 मे 2024 पासून उपलब्ध करून देण्यात येत असून, या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, असे देखील डॉ. मोहितकर यांनी स्पष्ट केले आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिलेल्या निर्देशानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांच्या माध्यमातून यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी मान्यता प्रक्रिया डिसेंबर 2023 च्या दरम्यान सुरू झाली आहे. लवकरच पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता मिळणे अपेक्षित आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी/वास्तुकला पदविका, प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी व सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे ऑनलाइन पद्धतीने पार पाडल्या जातात.

# सीएसआयआर नेटसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ!

**उमेदवारांना २७ मेपर्यंत भरता येणार अर्ज**



नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएने सीएसआयआर नेट जून 2024 परीक्षेसाठी नोंदणी करण्याची आणखी एक संधी दिली आहे. सीएसआयआर नेटसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख 27 मेपर्यंत वाढवण्यात आली आहे. ज्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव आतापर्यंत अर्ज करता आले नाहीत, त्यांच्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी csirnet.nta.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कनिष्ठ संशोधन फेलोशिप अर्थात जेआरएफ, सहाय्यक प्राध्यापकांची भरती आणि देशातील विद्यापीठांमध्ये पीएचडी कार्यक्रमांसाठी प्रवेश यासाठी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन राष्ट्रीय पात्रता परीक्षेचे आयोजन जून महिन्यात 25, 26 आणि 27 जून रोजी करण्यात आले आहे. ऑनलाइन अर्ज भरण्याची शेवटची तारीख 27 मे असून परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख 27 मे आहे. येत्या 29 ते 31 मे 2024 पर्यंत अर्जात दुरुस्ती करण्याची संधी दिली जाणार आहे.

# एमएचटी सीईटीच्या उत्तरतालिकेवर आक्षेप नोंदविता येणार

**पीसीएम ग्रुपसाठी २६ मेपर्यंत संधी**

**एमएचटी सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलद्वारे पीसीबी आणि पीसीएम ग्रुपची उत्तरतालिका उपलब्ध करून दिली आहे. तसेच उत्तरतालिकेतील उत्तरांसदर्भात काही आक्षेप असतील तर ते सशुल्क नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**



शैक्षणिक वर्ष 2024-25 करीता अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र व कृषी शिक्षण पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता 22 ते 30 एप्रिल दरम्यान पीसीबी ग्रुप आणि 2 मे ते 16 मे दरम्यान पीसीएम ग्रुपची सीईटी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेची उत्तर तालिका आणि उमेदवारांनी सोडविलेली प्रश्नपत्रिका संबंधित विद्यार्थ्यांच्या लॉगीन आयडीवर प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांमधील प्रश्न आणि उत्तर तालिका यांच्यावर आक्षेप असल्यास पोर्टलवर जावून प्रति आक्षेप एक हजार रुपये भरुन आक्षेप नोंदविण्यासाठी पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. पीसीबी ग्रुपसाठी 22 ते 24 मेपर्यंत संधी होती, तर पीसीएम ग्रुपसाठी 24 ते 26 मेपर्यंत संधी देण्यात आली आहे. दिलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना आक्षेप नोंदविता येणार आहे. विद्यार्थ्यांनी नोंदविलेल्या आक्षेपांचा विचार करून त्यानंतर एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

# आरोग्यसेवक, ग्रामसेवक परीक्षा कधी?

**जिल्हा परिषद भरतीच्या आरोग्यसेवक आणि ग्रामसेवक पदांच्या परीक्षा अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत. ग्रामविकास विभागाने परीक्षांच्या तारखेबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी स्पर्धा परीक्षार्थींनी केली होती. अखेर आरोग्यसेवक, ग्रामसेवक या पदांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, संबंधित परीक्षा जून महिन्यातच घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**




आरोग्यसेवक, ग्रामसेवक या पदांच्या परीक्षा या लवकरात लवकर घेण्यात याव्यात. परंतु, उमेदवारांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळेल, यादृष्टीने किमान 30 दिवस आधी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने शासनाकडे केली होती. परीक्षेसंदर्भात जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार हंगामी आणि कायमस्वरूपी पुरुष आरोग्यसेवक पदासाठी घेण्यात येणारी परीक्षा 10 जून ते 15 जूनदरम्यान घेण्यात येणार आहे. आरोग्यसेविका या पदासाठी 16 जूनला परीक्षा घेण्यात येणार आहे, तर ग्रामसेवक या पदासाठी 16 ते 21 जूनदरम्यान परीक्षा घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. हंगामी आणि कायमस्वरूपी पुरुष आरोग्यसेवक या पदासाठी 1 लाख 75 हजार 636 उमेदवार परीक्षा देणार आहेत. आरोग्यसेविका या पदासाठी 27 हजार 818 महिला उमेदवार परीक्षा देणार आहेत, तर ग्रामसेवक या पदासाठी 1 लाख 35 हजार 171 उमेदवार परीक्षा देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ग्रामसेवक, आरोग्यसेवक या पदांसाठी मागील काही महिन्यांपासून भरती प्रक्रिया सुरू आहे. अर्ज भरून चार महिने लोटले आहेत. परंतु, परीक्षेची तारीख निश्चित करण्यात आली नव्हती. त्यामुळे परीक्षा केव्हा घेतली जाणार, या विचाराने ग्रामसेवक आणि आरोग्यसेवक भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांचा जीव टांगणीला लागला होता. अखेर आता वेळापत्रक जाहीर करण्यात आल्यामुळे संबंधित उमेदवारांना दिलासा मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मिशन अकरावी ॲडमिशन!

**राज्यात मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, अमरावती आणि नागपूर या सहा विभागांसाठी अकरावी प्रवेश हे ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केले जातात. अर्ज भरण्याची प्रक्रिया ही दोन टप्पात केली जाते. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना नोंदणी करता येते आणि त्यानंतर दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अर्जाच्या भाग दोनमध्ये आवडीच्या महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम (गुणवत्तेनुसार) भरायचे असतात.**

दहावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज कसा करायचा यासंदर्भातील माहिती कळावी यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले असून 24 मेपासून विद्यार्थी नोंदणी आणि ऑनलाइन अर्जाचा भाग



1 भरता येणार आहे. 27 मे रोजी दहावीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे 27 मेपासून पुढील पाच दिवस विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग दोन भरण्याची संधी देण्यात येणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. दहावीच्या निकालानंतर कमी कालावधीत सर्व प्रवेश पूर्ण करण्याचे नियोजन शालेय शिक्षण विभागाचे आहे. यामुळे मे महिन्याच्या 21 मे तारखेपासून तयारी केली आहे. विद्यार्थी, पालक आणि कनिष्ठ महाविद्यालयांना या प्रवेशासंदर्भातील माहिती देण्याचे आदेशही शिक्षण उपसंचालकांना दिले आहेत. जागा व तुकड्यासंदर्भातील नोंदणीत बदल केले जाणार आहेत. या कालावधीत महाविद्यालयातील उपलब्ध जागा, विषय बदल, वाढीव तुकडी आदी माहितीसंदर्भात बदल करण्यासाठी मुभाही देण्यात आली आहे.

## असे आहे अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक

- अकरावी प्रवेश अर्जाचा भाग 1 भरणे : 24 मेपासून पुढे दहावीचा ( एसएससी बोर्ड ) निकाल लागल्यानंतर दोन दिवसापर्यंत.
- अर्जातील माहिती तपासून प्रमाणित करणे : 24 मेपासून पुढे दहावी निकालानंतर दोन दिवसापर्यंत.
- कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी : 22 मेपासून दहावी निकालापर्यंत.
- कॉलेजचा पसंतीक्रम नोंदविणे ( अर्ज भाग 2 ) : दहावी निकालानंतर पाच दिवस. (प्रत्येक फेरीपूर्वीही संधी )
- कोटा अंतर्गत प्रवेश : दहावी निकालानंतर पाच दिवस.
- नियमित प्रवेश फेरी 1 : दहावी निकालानंतर 10 ते 15 दिवस.
- नियमित प्रवेश फेरी 2 : 7 ते 9 दिवस.
- नियमित प्रवेश फेरी 3 : 7 ते 9 दिवस.
- विशेष फेरी 1 : 7 ते 8 दिवस.
- विशेष फेरी 2 ( एटीकेटीसह ) : एक आठवडा.
- दैनंदिन प्रवेश फेरी : आवश्यकता भासल्यास.


CONGRATULATIONS SAHEB !
अखेर विजय
जनशक्तीचा !!!
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
खासदार
मा. श्री. निलेश लंके साहेब
यांची खासदार पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक :
ओंकार उद्योग समुह
रुद्रा प्रतिष्ठान
संजय गारुडकर
अहमदनगर
Vitthala Publicity

## शॉर्ट न्यूज

### कोल्हारला १०५ झाडांची लागवड

**कोल्हार :** वर्षभर वृक्षरोपण व संवर्धनाची मोहिम राबविणाऱ्या जय हिंद फाउंडेशनच्यावतीने कोल्हार येथे १०५ झाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होत असताना व यावर्षी राज्यात सर्वच ठिकाणी तापमान वाढलेले असताना पर्यावरण संवर्धाला हातभार लावण्यासाठी वृक्षरोपण अभियान राबविण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सदस्य एकनाथ आटकर, महादेव पालवे, संदीप जावळे, शिवाजी गर्जे, प्रेमकुमार पालवे, रमेश जावळे, उपसरपंच इमरान शेख आदी उपस्थित होते.

### बाबुजी आव्हाड महाविद्यालयात वृक्षारोपण

**पाथर्डी :** येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात संत भगवानबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक ढोले यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बबन चौरे, एनएसएस विभागप्रमुख डॉ. अरुण राख, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे, प्रा. आनंद घोंगडे, कार्यालयीन अधीक्षक शशिकांत काळोखे, ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड उपस्थित होते.

### काळे समर्थकांची जोरदार बॅनरबाजी

**नगर :** लोकसभा निवडणुक विजयात लंकेसाठी काँग्रेस विधिमंडळ पक्ष नेते आ. थोरात किंगमेकर ठरले. थोरातांनी काही महिन्यांपूर्वी नगरमध्ये शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष काळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भव्य जनसंवाद यात्रेत आ. रवींद्र धंगेकर यांच्यासह उपस्थित राहत जनसंवाद सभेत काळे यांना नगर शहराचे आमदार व्हावे लागेल असे वक्तव्य केले होते. आता काँग्रेस कार्यकर्ते, काळे समर्थकांनी शहरात जायंट किलर खा. लंके यांना शुभेच्छा देत भावी आमदार संबोधत किरण काळे यांच्या विधानसभा उमेदवारीसाठी जोरदार बॅनरबाजी केली आहे.

### जिल्हाध्यक्षपदी दत्ताफलके यांची नियुक्ती

**निमगाव वाघा :** येथे अखिल वारकरी सेवा मंडळाच्या जिल्हा शाखेचा शुभारंभ करण्यात आला. तर संघटनेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. जिल्हा शाखेच्या फलकाचे अनावरण राज्य अध्यक्ष ह. भ. प. बलभीम महाराज पठारे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्राचे सचिव किशोर महाराज पठारे, सामाजिक कार्यकर्ते नाना डोंगरे, लक्ष्मण चौरे, नामदेव फलके, कर्जत तालुकाध्यक्ष, छगन महाराज गांगर्डे, भाऊसाहेब आनंदकर, बाबा खळदकर, ज्ञानदेव जाधव, काशीनाथ जाधव, तुलशीराम वाघुले, भाऊसाहेब कापसे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### वीज पडून एका गायीचा मृत्यू

**संगमनेर :** तालुक्यातील राजापूर येथील संपत दाजीभाऊ हासे या शेतकऱ्याच्या गाईवर वीज पडून गायीचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी पावणे चार वाजेच्या सुमारास घडली. त्यामुळे हासे यांचे मोठे नुकसान झाले. राजापूर गावांतर्गत असलेल्या आढळामळा येथे संपत हासे राहात आहे. त्यांच्याकडे पाच ते सहा गाया आहेत. नेहमीप्रमाणे गुरुवारी दुपारी त्यांनी घरासमोर असलेल्या झाडाला गाय बांधली होती. मात्र, विजेचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. याच दरम्यान वीज पडून गायीचा मृत्यू झाला.

# नरेंद्र मोदींचा होणारा तिसरा शपथविधीची चर्चेत

## परदेशी पाहुण्यांनाही सोहळ्यासाठी आमंत्रण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**विद्यमान काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बुधवारी पंतप्रधानपदाचा राजीनामा देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सोपवला. द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून नरेंद्र मोदी यांची नवं सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू पंतप्रधान म्हणून कायम राहण्याचे आवाहन केले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी एनडीएच्या मदतीने केंद्रात तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करण्यासाठी दावा करणार आहेत. 'एनडीए'च्या प्रमुखपदी एकमताने त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये, केंद्रात सरकार स्थापनेचा दावा तातडीने करण्याची विनंती मोदींना करण्यात आली. 'एनडीए'तील घटक पक्षांच्या नेत्यांनी मोदींना पाठिंब्याचे लेखी पत्रही दिले असून मोदींच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी शनिवारी ८ जून रोजी होण्याची शक्यता होती. परंतु, आता रविवारी ९ जून रोजी शपथविधी होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा शपथविधी सोहळा मोठ्या थाटात पार पडणार आहे. या तारांकित शपथविधी सोहळ्यात अनेक परदेशी नेते विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यामध्ये बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, श्रीलंकेचे राष्ट्राअध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांचा समावेश आहे.

# सुज्ञ मतदारांनी दडपशाहीला नाकारले

## सुप्रिया सुळे यांचे केंद्र सरकारवर शरसंधान



**पुणे : प्रतिनिधी**

**यंदाच्या लोकसभा निवडणुकीत 'इन्कम टॅक्स', 'सीबीआय' आणि 'ईडी'च्या दडपशाहीला मतदारांनी नाकारले; तसेच महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराला कंटाळून 'इंडिया' आघाडीच्या बाजूने मतदान केले,' अशा शब्दांत बारामती लोकसभेच्या नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर शरसंधान केले. 'राज्यात तीव्र दुष्काळाची परिस्थिती असून, मी आणि आमदार रोहित पवार यांच्यासोबत बारामती मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीचा पाहणी दौरा करणार असून, राज्य सरकारला धारेवर धरणार आहे,' असा इशाराही त्यांनी दिला.**

बारामती लोकसभा मतदारसंघातून दणदणीत मताधिक्याने विजय मिळविल्यावर सुप्रिया सुळे प्रथमच पुण्यातील मार्केट यार्ड येथे आल्या. 'दादांना सांगा, ताई आली', 'वहिनींना सांगा, ताई आली,' अशी घोषणाबाजी करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गुलाल व फुले उधळून त्यांचे जल्लोषात स्वागत केले. त्यानंतर निसर्ग कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

'राज्यात महागाई, दुष्काळ, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार अशी मोठी आव्हाने समोर आहेत. अनेक ठिकाणी दुष्काळ छावण्यांची मागणी असूनही ती मान्य झालेली नाही; तसेच चारा डेपो व पाण्याचे टँकरही वेळेवर पोहोचत नाहीत. त्यामुळे जनता त्रस्त झाली असून, महाविकास आघाडीच्या कामाची जबाबदारी वाढली आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष करण्यापेक्षा चारा छावणी, पाण्याचे टँकर व दुष्काळ निवारणासाठी मदत करावी,' असे आवाहनही त्यांनी केले.

**'ज्येष्ठांना सल्ला द्यायचा नसतो'**

'उपमुख्यमंत्री अजित पवारांना काय सल्ला देणार,' या प्रश्नावर 'अजित पवार हे माझ्यापेक्षा मोठे असून, लहानांनी ज्येष्ठांना सल्ला द्यायचा नसतो, तर त्यांच्याकडून घ्यायचा असतो,' असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. 'माझी लढाई ही कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात नसून, ती कायमच वैचारिक असते,' असेही त्यांनी नमूद केले. 'विजयानंतर शुभेच्छांसाठी सुनेत्रा पवार यांचा फोन आला का,' या प्रश्नावर 'सुनेत्रा पवार या वयाने, नात्याने आणि पदाने माझ्यापेक्षा मोठ्या आहेत. त्यांच्याबद्दल माझ्या मनात नेहमी प्रेम आणि आदरच राहील; तसेच पार्थ आणि जय मला मुलासारखेच आहेत,' असे सुळे म्हणाल्या.

**'धंगेकरांची भूमिका महत्त्वाची'**

'रवींद्र धंगेकर उमदे लोकप्रतिनिधी असून, त्यांना तिकीट जाहीर करण्यात विलंब झाल्याने प्रचाराला कमी वेळ मिळाला; परंतु राजकारणात जय-पराजय होत असतो.

# आता राजकारण विसरा, लोकांना पाणी द्या

## ■ अन्यथा सोमवारी आंदोलन करणार ■ प्रताप ढाकणे यांचा इशारा

**पाथर्डी : प्रतिनिधी**



**तालुक्यात भीषण पाणी टंचाई असताना, पालकमंत्री राजकारणात दंग आहेत. आमदार ठेकेदाराला सांभाळतात. शेवगावला १५ दिवसांतून, तर पाथर्डीला पाच-सहा दिवसांतून एकदा पाणी मिळते. आमदारांना कळत नाही का, पाण्यासाठी लोक तडफडत आहेत. जनावरे मरायला टेकली. प्रशासन नावाची गोष्ट अस्तित्वात आहे की नाही? लोकप्रतिनिधींनी, अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडावी. लोकांना पाणी द्या, अन्यथा सोमवारी (१० मे) ढाकणे स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते ॲड. प्रताप ढाकणे यांनी दिला. गलथान प्रशासन व सुस्तावलेले लोकप्रतिनिधी यांचे पाणी प्रश्नांसारख्या प्रश्नाकडे लक्ष वेधून ढाकणे यांनी निषेध केला.**

यावेळी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, शहराध्यक्ष योगेश रासने, बंडू पाटील बोरुडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. ढाकणे म्हणाले, की गटविकास अधिकारी ठेकेदारापुढे असाह्य असल्यासारखी उत्तरे देतात. प्रांताधिकारी वरिष्ठांकडे बोट दाखवतात. जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली, तर ते गांभीर्याने घेत नाहीत. सर्व यंत्रणा व लोकप्रतिनिधी ठेकेदारापुढे हतबल ठरत असतील, तर याचा अर्थ काय निघू शकतो? चार महिन्यांपासून आपण प्रशासनाशी बोलतोय. वेळकाढू उत्तराशिवाय काही साध्य होत नाही. टंचाई व टँकरचे अहवाल कागदपत्रे रंगत आहेत. प्रत्यक्षात काय ते बघा. डिझेलअभावी दोन-दोन दिवस टँकर उभे राहतात. काही टँकर गळत आहेत. चालकांना काही सांगता येत नाही. पूर्ण क्षमतेने टँकर भरले जात नाहीत. १५ वेळा नोटीस व तीन वेळा जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत निवेदन दिले.

आमदारांना टंचाईची बैठक घेऊन यंत्रणेला कामाला लावण्याचा अधिकार नाहीत का? मतदान संपल्यावर त्यांनी काय काम केले? लोक पाणी मागताहेत. प्रशासनाला लाज वाटली पाहिजे. कार्यकर्त्यांच्या पत्रांना साधे उत्तरसुद्धा देत नाहीत. नारळे फोडायचे आणि कमिशन खायचे, यापलीकडे जाऊन लोक प्रश्नांची सोडवणूक करावी लागते, याचे भान बाळगा. सर्वांनी मिळून लोकांची टिंगल चालवली आहे. असे वागणे महागात पडेल, एवढेच सांगतो. सोमवारी आंदोलनात लोकांचा उद्रेक दिसेल, असे ढाकणे यांनी सांगितले.

ढाकणे यांनी पत्रकार परिषद सुरू असतानाच जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याशी संपर्क साधून शेवगाव-पाथर्डीतील टंचाईची तीव्र परिस्थिती व प्रशासनाचा वेळ काढूपणाबाबत लक्ष वेधून आंदोलनाबाबत चर्चा केली. त्यावर आपण तातडीने लक्ष घालण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी ढाकणे यांना दिले.

ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्ज अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S) Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com

# पै.अक्षय कावरे पारनेर केसरीचा मानकरी!

## पूर्णवाद संघटना व शिवछत्रपती कुस्ती संकुलाच्या वतीने पारनेरात स्पर्धा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पूर्णवाद महोत्सवानिमित्त पूर्णवाद संघटना आणि शिवछत्रपती कुस्ती संकुल, पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथील शिवछत्रपती कुस्ती संकुलात भव्य जिल्हास्तरीय पारनेर केसरी कुस्ती स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत पै.अक्षय कावरे याने मानाचा पारनेर केसरी किताब पटकविला.**

या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील जवळपास ११० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.स्पर्धेचे उद्घाटन पारनेरचे नगरसेवक व पारनेर तालुका तालीम संघाचे अध्यक्ष युवराज पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा ६५ किलो, ७४ किलो आणि खुला गट या तीन गटांमध्ये खेळवण्यात आली. या स्पर्धेत अनेक धडाडीच्या कुस्त्या करत पारनेरचाच पै. अक्षय कावरे पारनेर केसरीचा मानकरी ठरला. तर पै. आकाश चव्हाण उप पारनेर केसरीचा मानकरी ठरला.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा पारनेरकर गुरु सेवा मंडळ अध्यक्ष पूर्णाचार्य ॲड. गुणेश पारनेरकर यांच्या हस्ते करण्यात आले. पारनेर केसरी अक्षय कावरे याला दीड किलो चांदीची गदा आणि रोख ४१ हजार रुपये पारितोषिक देण्यात आले. तर उपविजेता खेळाडूला ३१ हजार रुपये बक्षीस देण्यात आले.

पारनेर येथे झालेल्या जिल्हास्तरीय पारनेर केसरी कुस्ती स्पर्धेत अनेक खेळाडूंनी चमकदार कुस्त्या केल्या. स्पर्धे तील सर्व खेळाडूंना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली पराजित झालेल्या खेळाडूंना ही बक्षिसे देण्यात आली. सदर स्पर्धे साठी राष्ट्रीय पंच पै. गणेश जाधव , युवा महाराष्ट्र केसरी पै. विष्णू खोसे यांनी पंच म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेला पूर्णवाद महोत्सव समिती कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत पारनेरकर, ॲड. संकर्षण जोशी, फतेहसिंग यादव, वस्ताद कुंडलिक पठारे, बाळासाहेब पठारे , नगरसेवक ऋषिकेश गंधाडे, यशवंत पठारे , भाजपा तालुका खजिनदार किरण कोकाटे , सुभेदार शंकर खोसे, सरपंच धनजय खोसे, युवा महाराष्ट्र केसरी विष्णु खोसे, पारनेर केसरी सुनील खोडदे, संदीप भागवत, संदीप कावरे, तुषार औटी, एकनाथ उचाळे, साहेबराव पवार, अनेक मान्यवर व पालक वर्ग स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित होता.

शिवछत्रपती कुस्ती संकुलनात कुस्त्या झाल्या त्या ठिकाणी भव्य मातीचा आखाडा , ३ मॅटचा हॉल, भव्य अशी जिम, पहिलवानला राहण्यासाठी व जेवणासाठी उत्तम अशी सोय असुन त्या ठिकाणी जवळ पास ७० ते ८० मुले सराव करीत आहेत व त्याठिकाणी अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पहिलवान तयार झालेले आहेत.



### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

**(६५ किलो) विजेता अक्षय औटी (शिवछत्रपती कुस्ती संकुल पारनेर) उपविजेता गौरव रोहकले (गुरुकुल कुस्ती संकुल भाळवणी तालीम)(७४ किलो) विजेता कुमार देशमाने (गुरुकुल कुस्ती संकुल भाळवणी तालीम) उपविजेता सार्थक वाळुंज (शिवछत्रपती कुस्ती संकुल पारनेर).**

# दहावीनंतर आवडीचे क्षेत्रच विद्यार्थ्यांनी निवडावे

## ■ सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन ■ वासुंदे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**वासुंदे : प्रतिनिधी**

**भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेतील इ. १० वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व सत्कार संस्थेचे अध्यक्ष व अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी सुजित झावरे पाटील म्हणाले की, आपल्या पाल्यांवर कोणताही प्रकारचा दबाव न टाकता त्यांना आपल्या क्षेत्रात आवड आहे. त्याच क्षेत्राची निवड करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यावेळी इ.१० वी च्या विदयार्थी उत्तीर्ण झालेबद्दल अभिनंदन व पुढील शैक्षणिक क्षेत्रात शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेच्या ध्येयधोरणानुसार आधुनिक काळातील बदलांशी सुसंगत अशा शिक्षण पद्धतीतून सर्व घटकापर्यंत शिक्षण पोचविण्याचे अखंड प्रयत्न सुरू आहेत.

माणूस व शिक्षण या दोन्ही बाजू विकसित झाल्याशिवाय राष्ट्रविकास होऊ शकत नाही. उत्कृष्ट नागरिक हा शिक्षणाच्या माध्यमातून घडवता येतो असे ही प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.

विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ कार्यक्रम प्रसंगी सुजित झावरे यांच्यासह मा. सभापती अरुणराव ठाणगे, किसनराव धुमाळ, स्वप्निल राहींज, शरद पाटील सर, भाऊ सैद, उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन नारायण झावरे, व्हा. चेअरमन रा. बा. झावरे, दिलीपराव पाटोळे, बाळासाहेब पाटील, लक्ष्मण झावरे, मा. उपसरपंच लहानु झावरे, भाऊसाहेब जगदाळे, बाळासाहेब झावरे, पोपट झावरे सर, सुनील सैद, मारुती उगले गुरुजी, संग्राम झावरे, शांताराम झावरे, अशोक चेमटे सर, इंजि. निखिल दाते, इंजि. प्रसाद झावरे, विकास झावरे, आदी वासुंदे येथील ग्रामस्थ भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळांमधील मुख्याध्यापक शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.



### भाऊसाहेब महाराज शिक्षण संस्थेच्या विविध विद्यालयातील निकाल

**खंडेश्वर विद्यालय, पिंपळगाव रोठा ९३.३३%, न्यू इंग्लिश स्कूल, वासुंदे ९८.४१%, आदर्श विद्यालय, पळसपूर १००%, समर्थ विद्यालय, पोखरी ९१.११% विकास विद्यालय, नांदूरपठार १००% प्रगत विद्यालय, वनकुटे ९९.६९% समता विद्यालय, तिखोल ९२.८५% उदय विद्यालय, राळेगण थेरपाळ १००% मेहेरबाबा विद्यालय, वडगाव सावताळ १००%**

# श्री.समर्थ पॉलीटेक्निकमध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा

## पाणी वाचवा, जीवन वाचवाचा संदेश



**सुपा : प्रतिनिधी**

**श्री.समर्थ अकॅडमी संचलित श्री.समर्थ पॉलीटेक्निक म्हसणे येथे जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. जागतिक पर्यावरण दिन साजरा करूनजागोजागी झाडे लावा हा एक छोटासा संदेश या उपक्रम करून देण्यात आला.**

यावेळी वनविभाग पारनेर यांच्याकडून महाविद्यालयामध्ये वन महोत्सव अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी एस व्ही गोरे (मॅडम )उपस्थित होत्या तर समवेत विभागातील वनपाल पी.व्ही. सोनवणे ,गणेश जाधव , साबळे व इतर वन विभाग कर्मचारी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण करून लावलेले प्रत्येक झाड जगवण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प उपस्थित सर्व महाविद्यालय कर्मचाऱ्यांनी केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डी .डी. देसले यांनी सांगितले की काही मानवनिर्मित कारणामुळे वातावरण, पाणी, इत्यादीवर परिणाम होत आहे पृथ्वीचे तापमान वाढत आहे आणि ग्लोबल वार्मिंगचे समस्या निर्माण होत आहे. जी मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळे पर्यावरणाचे महत्त्व समजून आपण सर्वांनी पर्यावरण वाचवण्यासाठी सहकार्य केले पाहिजे आणि याच संकल्पनेतून वृक्षारोपणाचा सत्य उपक्रम आयोजनात राबवण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे संचालक कैलास गाडीलकर यांनी या उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले आणि पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# अनिकेत चौधरी यांची मास्टर इन सिव्हील इंजिनिअरपदावर निवड

## कल्पतरू सेवाभावी संस्थेकडून मिळाले प्रोत्साहन

**निघोज : प्रतिनिधी**



**मुंबई येथे कार्यरत असलेले मात्र पारनेर तालुक्यातील निघोज येथील अनिकेत विलास चौधरी यांची मास्टर इन सिव्हील इंजिनिअर या पदावर निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.**

अनिकेत यांना दहावी व बारावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळाल्याने त्यांनी सिव्हिल इंजिनिअर होण्याचा मानस व्यक्त केला. विषेश म्हणजे त्यांनी क्रिकेट खेळात प्राविण्य मिळवले असून मुंबई येथील नामांकित संघात त्यांना क्रिकेट खेळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच ते गुणवंत विद्यार्थी म्हणून पहिल्यापासून हुशार असल्याने त्यांना शैक्षणिक क्षेत्रात कोणतीही अडचण आली नाही. त्यांचे वडील विलास चौधरी व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य हे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कल्पतरू फंडचे सदस्य आहेत. हुशार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून होत असते.

अनिकेत यांनाही या कल्पतरू समाजसेवी संस्था माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले.मास्टर इन सिव्हील इंजिनिअर मध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचे बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, जी एस महानगर बँकेचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश कवाद,कल्पतरु सामाजिक संस्थेचे अध्यक्ष हिरेश चौधरी, कॅप्टन विठ्ठलराव वराळ , माजी सरपंच लताबाई कवाद, कल्पतरू समाजसेवी संस्थेचे पदाधिकारी वाय एम उर्फ यशवंत वराळ, सेंट्रल बँक सेवानिवृत्त अधिकारी पोपटराव कवाद, बाळासाहेब कवाद आदिंनी तसेच कल्पतरू समाजसेवी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच मार्गदर्शक यांनी अनिकेत विलास चौधरी यांचे अभिनंदन केले आहे.

### कल्पतरुची विद्यार्थ्यांना प्रेरणा

**कल्पतरू समाजसेवी संस्था माध्यमातून आम्ही भरारी या गुणात्मक विद्यार्थी संघाची स्थापना केली असून आजपर्यंत बहुसंख्य विद्यार्थ्यांना यामधून प्रोत्साहन व प्रेरणा मिळाली आहे. आजच्या हायटेक युगात विद्यार्थी हा गुणवंत होण्यासाठी तसेच नामांकित कंपनीत संधी मिळून राज्य औद्योगिक विकास करण्यासाठी पुढे जाण्यासाठी आम्ही कल्पतरू समाजसेवी संस्था व भरारी गुणवंत विद्यार्थी या माध्यमातून प्रयत्नशील आहोत.**

**हिरेश चौधरी**
**अध्यक्ष कल्पतरू समाजसेवी संस्था मुंबई व निघोज**

### शैक्षणिक कार्यासाठी पुढाकार

**कल्पतरू समाजसेवी संस्था व भरारी गुणवंत विद्यार्थी या माध्यमातून मला व असंख्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रेरणा महत्वाची असून गेली दहा ते बारा वर्षात कल्पतरूने शैक्षणिक कार्यासाठी पुढाकार घेऊन असंख्य विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले हा पारनेर तालुक्यासाठी व मुंबई परिसरातील जनतेसाठी अभिमानास्पद बाब आहे.**

**अनिकेत विलास चौधरी.**
**मास्टर इन सिव्हील इंजिनिअर**

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्यासाठी सर्वाधिक योगदान

## शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्यासाठी सर्वाधिक योगदान असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद यांनी व्यक्त केले आहे.**



निघोज येथील विद्याधन शिक्षण समूहाच्या माध्यमातून शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माजी पोलीस पाटील पांडुरंग लंके पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी पोस्ट अधिकारी दिलीप उनवणे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, प्रा.डोके, लंके तात्या तसेच ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवव्याख्याते प्रा कवाद यावेळी म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य निर्माण करुण सर्वसामान्य जनतेसाठी मोठे योगदान दिले आहे. आज सुद्धा आजचे राज्यकर्ते विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत किंवा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याच स्वराज्याची संकल्पना मांडीत राज्य कारभार करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे एक असे राजे होते की देशात व जगात त्यांचा नावलौकिक आहे. जगातील प्रमुख देशात त्यांची किर्ती असून आपल्या राज्याला अभिमान वाटतो अशीच कामगिरी छत्रपती शिवाजी महाराज यांनी केली असून कित्येक शतके या राजाची महती जगात राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. यावेळी माजी पोलीस पाटील पांडुरंग लंके पाटील, दिलीप उनवणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# मित्राच्या वाढदिवसाची पार्टी बेतली मजूराच्या जीवावर

## ■ मद्यपी तरूणांच्या गाडीने दोन मजूरांना चिरडले ■ कवठे यमाई येथील घटना ■ एका मजूराचा मृत्यू,एक जखमी

**शिरुर : प्रतिनिधी**



**तालुक्यातील कवठे यमाई येथे एका मित्राच्या वाढदिवसाची पार्टी करून धाब्यावरून उलट्या दिशेने येणाऱ्या चार चाकी गाडीने धडक दिल्याने एका निष्पाप तरुण मजुराचा जागीच मृत्यू झाल्यांची घटना घडली आहे.**

पुणे येथे पोंशो अपघात प्रकरण गाजत असताना शिरूर तालुक्यातही अनेक अल्पवयीन व व्यसनाधीन तरुणांनी अपघातामध्ये अनेकांच्या बळी घेतलेल्या घटना रोज घडत आहे .

कवठे यमाई येथे अष्टविनायक महामार्गावर एका धाब्याच्या जवळ हा अपघात बुधवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास झाला.

फिर्यादी अमोल गोरक्ष येठेकर वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती, रा. मु. पो. गुंडेगाव, ता. अहिल्यानगर यांनी फिर्याद दिली असून या मधे दिपक जालिंदर येठेकर ( वय ३३ ) रा गुंदेगाव यांचा मृत्यु झाला आहे.

या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार कवठे येमाई - पारगाव रस्त्यावर फिर्यादी यांचा चुलत भाऊ दिपक हा मोटार सायकल नं. एम. एच.१६. सी. आर. ७७८५ चालवित जेवणाचा डबा आणण्याकरीता कामगार रंगनाथ बन्सी आढाव याचेसह जात असताना कवठे येमाई बाजूने पारगाव कडे रॉंग साईडने धाब्यावरून येणा-या इको गाडी नं. एम.एच. १२.टी.डी.८७१७ चालकाने याने त्याचे ताब्यातील इको गाडी ही रॉंग साईडने भरधाव वेगाने येत मोटार सायकलला जोरदार धडक दिली . त्यामधे दिपक येठेकर याचा मृत्यू झाला असून पाठीमागे बसलेला रंगनाथ आढाव यांना जखमी झाले आहे .

चार चाकी गाडी चालविणारे तरुण हे एका मित्राच्या वाढदिवसाची पार्टी असल्याने धाब्यावर मद्यसेवन करीत फार्महाऊसवर बकऱ्यावर ताव मारायला निघाल्याची चर्चा परीसरात आहे . त्यामुळे वाढदिवसाची पार्टी मात्र एका गरीब मजुराच्या जीवावर बेतली असुन गाडी चालक पसार झाला आहे . गाडीचा मालक कोण ? चालक कोण ? याचा तपास पोलिस करून आरोपीला गजाआड करण्याची मागणी नागरीका कडून केली जात आहे . या गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर करीत आहेत .

# श्रीगोंद्यातील जनतेने मला तारले ! खा.नीलेश लंके

## ■ कांदाप्रश्नावर संसदेत आवाज उठवणार ■ नवनिर्वाचित खासदार लंके यांचा श्रीगोंदा तालुक्याचा दौरा ■ गावोगावी कार्यकर्त्यांनी केले उत्स्फूर्त स्वागत

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**अटीतटीच्या लोकसभा निवडणुकीत माझी जन्मभूमी असलेल्या श्रीगोंद्यातील जनतेने मला तारले, असे प्रतिपादन करतानाच नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांनी श्रीगोंदेकरांचे आभार मानले. तसेच, कांदा निर्यात बंदी उठवण्यासाठी संसदेत आवाज उठवणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.**



खासदार झाल्यानंतर लंके यांनी लगेच मतदारांचे आभार व्यक्त करण्यासाठी श्रीगोंद्याचा दौरा केला. सुरुवातीला संत श्री शेख महंमद बाबा मंदिरात दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. तालुक्यातील विविध गावांमध्ये फटाक्यांच्या आतषबाजीत, तसेच गुलालांची उधळण करीत कार्यकर्ते, पदाधिकारी, तसेच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी त्यांचे स्वागत केले. माजी आमदार राहुल जगताप यांच्या पिंपळगाव पिसा येथून त्यांनी दौऱ्याला सुरुवात केली. राहुल जगताप यांच्या निवासस्थानी राहुल यांच्या पत्नी डॉ. प्रणोती, तसेच मातोश्री अनुराधा जगताप यांनी लंके यांचे औक्षण करीत स्वागत केले. नंतर माजी आमदार राहुल जगताप यांनी गाडीचे सारथ्य करीत लंके यांची जन्मभूमी असलेल्या खरातवाडी येथे गेले. तेथे कार्यकर्त्यांनी खा. लंके यांचे स्वागत केले.

बेलवंडी, पारगाव फाटा, पारगाव सुद्रिक, मखरेवाडी येथेही त्यांचे स्वागत करण्यात आले. शहरात फटाक्यांच्या आतषबाजी करीत शनि चौक ते संत श्री शेख महंमद बाबा मंदिरादरम्यान मिरवणूक काढण्यात आली. यावेळी बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, मनोहर पोटे, एम. डी. शिंदे, राजू गोरे, बाळासाहेब दुतारे आदी उपस्थित होते.


राजा का बेटा
राजा नही बनेगा,
राजा वही बनेगा
जो सही हकदार होगा..!
खासदार
निलेश लंके साहेब
यांचे हार्दिक अभिनंदन..!
- * शुभेच्छुक *-
श्री. प्रविण नंदकुमार वारुळे
श्री. सचिन नंदराम कराळे
निलेश लंके प्रतिष्ठाण, महाराष्ट्र राज्य
CRYSTON MEDIA